कार्यालय पोलीस उप अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो, धाराशिव
सत्यमेव जयते

:: प्रेस नोट ::

दिनांक :- ०८.०२.२०२४

**आरोपी लोकसेवक -** सिध्देश्वर मधुकर शिंदे वय ३९ वर्षे, पद - वित्त व लेखाधिकारी, श्री. तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापुर जि. धाराशिव. ( खाते - वित्त विभाग, वर्ग - २ )

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धाराशिव |
| **पोलीस स्टेशन** | पोलीस ठाणे तुळजापुर जि. धाराशिव |
| **गुन्हा नोंद व कलम** | पोलीस ठाणे तुळजापुर गुरंन ४८/२०२४ क. ७ भ्र. प्र. अधि. सन १९८८ |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | सिध्देश्वर मधुकर शिंदे वय ३९ वर्षे, पद - वित्त व लेखाधिकारी, श्री. तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापुर जि. धाराशिव. ( खाते - वित विभाग, वर्ग - २ ) |
| **लाचेची रक्कम** | १०,००,०००/- रूपये ( दहा लाख रूपये ) लाचेची मागणी करून ६,००,०००/- रूपये ( सहा लाख रूपये ) लाच रक्कम स्विकारली |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे शासकीय कॅन्ट्रॅक्टर असुन तक्रारदार यांना श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापुर संचलीत श्री. तुळजाभवानी सैनिक विदयालयाचे प्रशासकीय इमारतीचे पहिल्या मजल्याचे तसेच प्रवेशद्वाराचे व संरक्षक भिंतीचे बांधकामाचे ०३ करोड ८८ लाखाचे कॅन्ट्रॅक्ट मिळाले होते. सदर बांधकामाचे ९० टक्के काम पुर्ण झाले आहे. सदर बांधकामाचे आत्तापर्यंत ०२ करोड पेक्षा जास्त बिल तपासणी करून मंजुरीसाठी पाठवुन मिळवुन दिले म्हणुन तसेच उर्वरीत बिल तपासणी करून मंजुरीसाठी पाठविणेकरीता तसेच अतिरीक्त सुरक्षा रक्कम म्हणुन भरलेली ३४,६०,५७९ /- रूपये ही परत मिळवुन देण्यासाठी आलोसे याने पंचासमक्ष १०,००,०००/- रूपये ( दहा लाख रूपये ) लाचेची मागणी करून तडजोडअती ६,००,०००/- रूपये ( सहा लाख रूपये ) स्विकारण्याचे मान्य करून दि. ०७/०२/२०२४ रोजा पंचासमक्ष ६,००,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले वरून गून्हा नोंद |

सदरची कारवाई मा. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर, यांचे मार्गदर्शनाखाली सिध्दाराम म्हेत्रे, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. धाराशिव. व पोलीस अंमलदार दिनकर उगलमुगले, सचिन शेवाळे, अशीष पाटील ला. प्र. वि. धाराशिव युनिट यांनी केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता** | **:- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव .** |
| **संकेतस्थळ** | **:- १. acbwebmail@mahapolice.gov.in**<br>**२. dysposmanabad@gmail.com** |
| **ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** | **:- acbmaharashtra.net** |
| **टोल फ्रि क्रमांक** | **:- १०६४** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **:- ०२४७२-२२२८७९** |
| **पोलीस अधीक्षक, लाप्रवि, छत्रपती संभाजीनगर** | **:- ९९२३०२३३६१** |
| **पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, धाराशिव** | **:- ९५९४६५८६८६** |

Shmhetre 08/02/24

**(सिध्दाराम म्हेत्रे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन,ब्युरो,धाराशिव**

Scanned with CamScanner